# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## जाहीर प्रगटन

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या कार्यक्षेत्रात शैक्षणिक वर्ष २०११–१२ करिता नवीन महाविद्यालये व संलग्नित महाविद्यालयांसाठी अभ्यासक्रम / विषय / विद्याशाखा / तुकडी / नैसर्गिक वाढ / संलग्निकरणाचे नूतनीकरण / कायम संलग्निकरण इत्यादीसाठी सादर करावयाचे विहीत नमुन्यातील आवेदनपत्र / प्रस्ताव आणि विद्यापीठाचा बृहत आराखडा (Perspective Plan 2011-16) विद्यापीठाच्या प्रकाशन विभागातून दि. १ आक्टोबर २०१० पासून विक्रीस उपलब्ध करून देण्यात येत आहेत. संबंधीत आवेदनपत्र / प्रस्ताव पूर्णपणे भरून विहीत शुल्कासह विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ८२(३) अन्वये ३१ आक्टोबर २०१० अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग (विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण) विनियम २००९, दिनांक २० फेब्रुवारी २०१० पासून लागू झालेले असून त्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या मा. महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ आणि मा. व्यवस्थापन परिषद यांनी मान्यता दिलेली आहे. सदर विनियमाची प्रत वर नमुद केलेल्या आवेदनपत्र / प्रस्तावासोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

वर नमूद केलेल्या विनियमातील तरतूदीनुसार व बृहत आराखडयामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संलग्निकरणाची मागणी करण्यापूर्वी आवश्यक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपलब्धता, वीज, पाणी, स्वच्छतागृह इत्यादींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था इत्यादी सर्व बाबींची उपलब्धता असणे आवश्यक आहे. त्यामुळे नवीन महाविद्यालयासाठी प्रस्ताव/आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी या बाबत खातरजमा करून घ्यावी. त्याच प्रमाणे संपूर्ण प्रस्तावाची आणि संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयाचे छायाचित्रण अथवा व्हिडीओ शुटींग करुन त्याची सी.डी. प्रस्तावाच्या प्रत्येक प्रतीसोबत जोडण्यात यावी. प्रशासनास आवश्यक वाटल्यास, संस्थेच्या प्रस्तावित महाविद्यालयासाठी तपासणी समिती पाठविण्यात येईल

प्रस्तावित महाविद्यालयांची प्राथमिक यादी साधारणत: नोव्हेंबर–२०१० च्या शेवटच्या आठवडयात विद्यापीठात व विद्यापीठाचे संकेतस्थळ www.srtmun.ac.in वर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत काही दुरुस्त्या, सूचना असल्यास महाविद्यालयांनी यादी प्रसिध्द झालेल्या तारखेपासून तीन दिवसात दुरुस्त्या/सूचना लेखी स्वरुपात सादर कराव्यात. तद्नंतर आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.

स्वाक्षरीत
**कुलसचिव**